आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२१ जानेवारी २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- दरवर्षी वीज दरात बदल करण्याची आणि सबसिडीचे सुसुत्रीकरण करण्याची राष्ट्रीय वीज धोरणाच्या मसुद्यात शिफारस

- अटल पेन्शन योजनेला केंद्रीय मंत्रीमंडळाकडून ५ वर्षांची मुदतवाढ

- वंदे मातरम गीताला दीडशे वर्ष झाल्याच्या निमित्ताने यंदाच्या प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य सोहळ्यात विशेष सादरीकरण

**आणि**

- भारताविरुद्धच्या टी-ट्वेंटी मालिकेतल्या पहिल्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा न्यूझीलंडचा निर्णय

**<><><><><>**

केंद्र सरकारनं आज राष्ट्रीय वीज धोरण २०२६ चा मसुदा जाहीर केला. राज्य वीज नियामक आयोगानं वीजेच्या दरांच्या संदर्भात आदेश दिला नाही तर योग्य निर्देशांकाच्या आधारे वीजेचे दर प्रत्येक वर्षी बदलण्याची शिफारस या मसुद्यात आहे. ग्राहकांना तसंच रेल्वे, मेट्रो आणि विविध उद्योगांना दिल्या जाणाऱ्या सबसिडीत सुसुत्रीकरण करण्याची शिफारस यामध्ये आहे. २०३० पर्यंत दरडोई वीज वापर २ हजार किलोवॅटपर्यंत आणि २०४७ पर्यंत ४ हजार किलोवॅटच्या पलीकडे घेऊन जाण्याचं उद्दिष्ट या धोरणात ठेवलं आहे. सध्या हे प्रमाण दीड हजार किलोवॅटपेक्षा कमी आहे.

सिडबीमध्ये ५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. या निर्णयामुळे २५ लाख ७५ हजारांपेक्षा जास्त सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगातल्या लाभार्थ्यांना याचा फायदा होणार आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं अटल पेन्शन योजनेला २०३०-३१ या आर्थिक वर्षापर्यंत मुदत वाढ दिली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रीमंडळाच्या नवी दिल्लीत आज झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. या योजनेच्या लाभार्थ्यांना पेन्शन मिळत रहावी यासाठी कमी पडणारी रक्कम द्यायलाही मंत्रीमंडळानं मान्यता दिली. सध्या देशभरातल्या ८ कोटी ६६ लाखांहून अधिक नागरिकांनी या योजनेसाठी नोंदणी केली आहे. वयाची ६० वर्ष पूर्ण केल्यावर त्यांना १ हजार ते ५ हजार रुपयांपर्यंत पेन्शन मिळेल.

**<><><><><>**

लोकशाही बळकट करण्यासाठी त्रुटीविरहीत मतदार यादी अत्यावश्यक असल्याचं प्रतिपादन देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी केलं आहे. या मतदारयादीत सर्व पात्र आणि कायदेशीर मतदारांचं नाव आवश्यक आहे, असंही ते म्हणाले. विविध देशातल्या निवडणूक आयोगांच्या अधिकाऱ्यांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्रात ते नवी दिल्लीत बोलत होते. ७० देशातले १०० हून अधिक अधिकारी या परिषदेला उपस्थित आहेत.

बिहार विधानसभा निवडणुकीत मतदार यादीतल्या त्रुटी मोठ्या प्रमाणात दूर करण्यात आल्या. मतदार यादीतल्या त्रुटी दूर करण्यापासून निवडणुका घेण्यापर्यंतची पूर्ण प्रक्रीया अतिशय कार्यक्षमतेनं राबविली गेली. त्यामुळं एक लाखांहून अधिक मतदान केंद्रांपैकी एकाही ठिकाणी पुन्हा मतदान घेण्याची वेळ आली नाही, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

अरवलीमधलं खाणकाम आणि संबंधित प्रश्नांची समग्र तपासणी करण्यासाठी विशेषज्ञांचा समावेश असलेली एक तज्ञ समिती स्थापन करणार असल्याचं सर्वोच्च न्यायालयानं आज सांगितलं. त्यासाठी खाणकामात तज्ज्ञ असलेल्या पर्यावरणवाद्यांची आणि शास्त्रज्ञांची नावं चार आठवड्यात सुचवण्याचे निर्देश

सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जोयमाल्या बागची, आणि न्यायमूर्ती विपुल एम पंचोली यांच्या खंडपीठानं अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी, यांना दिले.

ही समिती सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आणि देखरेखीखाली काम करेल, असं न्यायालयानं सांगितलं. बेकायदेशीर खाणकामामुळे भरुन न येणारं नुकसान होऊ शकतं, असं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं. असं कोणतंही अनधिकृत खाणकाम होणार नाही, असं आश्वासनही राजस्थान सरकारच्या वतीनं उपस्थित असलेले अतिरिक्त सॉलिसिटर जनरल के एम नटराज यांच्याकडून न्यायालयानं नोंदवून घेतलं.

**<><><><><>**

एआय नियमन करताना केवळ स्वतंत्र कायद्याचं नाही तर तांत्रिक - कायदेशीर दृष्टीकोनाचंही पालन करायला हवं असं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. दावोस इथं जागतिक आर्थिक मंचावर ते काल बोलत होते. डीप फेकसारख्या प्रकारांना आळा घालण्यासाठी मजबूत तांत्रिक साधनांची आवश्यकता असल्याचं वैष्णव म्हणाले. डीप फेकची ओळख पटवण्यासाठी भारत तंत्रज्ञान विकसित करत आहे, असं त्यांनी सांगितलं.

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात भारत दुसऱ्या श्रेणीत आहे हा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या प्रमुखांचा दावा वैष्णव यांनी फेटाळून लावला. भारतात सध्या दोन लाख स्टार्टअप्स आहेत. सेमिकंडक्टर क्षेत्रात भारत येत्या काळात पहिल्या पाच देशात स्थान मिळवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.  आज त्यांनी दावोस इथं आयबीएमचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद कृष्णा आणि मेटाचे मुख्य जागतिक व्यवहार अधिकारी जोएल कप्लन यांची भेट घेतली.

**<><><><><>**

देशातल्या आरोग्य सेवेत कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर वाढवण्याच्या दृष्टीनं देशातल्या ५० हजार डॉक्टरांना एआयचं प्राथमिक ज्ञान देणाऱ्या कार्यक्रमाचं उद्धघाटन आज केंद्रीय आरोग्य राज्य मंत्री अनुप्रिया पटेल यांच्या हस्ते झालं. कृत्रिम बुद्धीमत्तेच्या माध्यमातून उपचार, रोगनिदान आणि निश्चित निर्णय प्रक्रियेत तसचं आरोग्य आणि संशोधन क्षेत्रातल्या एआयच्या वापराचं प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी या आधीच ४२ हजार डॉक्टरांनी नोंदणी केली असल्याची माहिती आरोग्य मंत्रालयाच्या प्रसिद्धी पत्रकात देण्यात आली आहे.

**<><><><>**

विधीमंडळाच्या उद्यापासून सुरु होणाऱ्या अधिवेशनात अभिभाषण करायला कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गहलोत यांनी नकार दिला आहे. कर्नाटक राज्य सरकारनं विकसित भारत जी राज जी योजनेची अंमलबजावणी करायला नकार दिला आहे. त्यामुळं केंद्र आणि राज्य सरकारमध्ये निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी हा निर्णय घेतला आहे. राज्यपालांनी त्यांच्यासाठी तयार करण्यात आलेल्या भाषणातल्या काही मुद्द्यांवर आक्षेप घेतल्याची माहिती संसदीय कामकाज मंत्री एच. के. पाटील यांनी दिली. आपलं शिष्टमंडळ राज्यपालांची भेट घेऊन त्याचं मन वळवण्याचा प्रयत्न करणार असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

नवी दिल्लीत होणाऱ्या ७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला दीडशे वर्ष पूर्ण झाल्याचं औचित्य साधून या समारंभात स्वतंत्रता का मंत्र- वंदे मातरम आणि समृद्धी का मंत्र - आत्मनिर्भर भारत या संकल्पना सादर केल्या जाणार आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सजवलेल्या घोडागाडीतून कर्तव्य पथावर येतील आणि विविध सशस्त्र दलांकडून मानवंदना स्वीकारतील. १७ राज्य आणि केंद्रशासित

प्रदेशांचे तसंच १३ मंत्रालयं आणि विभागांचे एकूण ३० चित्ररथ सुमारे अडीच हजार कलाकारांसह  या संचलनात सहभागी होणार आहेत. भारतीय लष्कराच्या १८ तुकड्या आणि १३ वाद्यवृंद संचलनात भाग घेणार आहेत. युद्धभूमीवरची विमानं आणि शस्त्रास्त्रांची व्यवस्था यावेळी प्रथमच प्रदर्शित केली जाणार आहे. उद्या गुरुवारी या सोहळ्याची रंगीत तालीम होईल.

**<><><><><>**

बांग्लादेशातल्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २९८ मतदारसंघात १ हजार ९६७ उमेदवार रिंगणात आहेत. याठिकाणी अर्ज मागे घेण्याची मुदत आज संपली. इतर २ मतदारसंघात सोमवारपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. बांग्लादेश नॅशनलिस्ट पक्षानं २८५ मतदार संघात तर जमात-ए-इस्लामीनं २४३ मतदारसंघात उमेदवार उभे केले आहेत. बांग्लादेशात १२ फेब्रुवारीला मतपत्रिकेद्वारे मतदान होणार आहे.

**<><><><><>**

आगामी टी-ट्वेंटी विश्वचषकातले सामने भारताबाहेर हलवण्याची बांग्लादेश क्रिकेट मंडळाची मागणी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं पुन्हा फेटाळून लावली. आज झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीनंतर आयसीसीनं हा निर्णय जाहीर केला. बांग्लादेशाच्या संघाला भारतात काहीही धोका नसल्याचं विविध पाहणीत आढळून आल्याचं आयसीसीनं म्हटलंय.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना आज नागपूरमधे विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर सुरू आहे. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. अभिषेक शर्मानं ८ षटकार आणि ५ चौकाराच्या मदतीनं ८४ धावा केल्या. शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १३ षटकात ४ बाद १५४ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**